लोकमत ५.११.२०.१

उमेदवारी मिळाली नाही तर...

# आजी-माजी आमदार अपक्ष लढण्यास तयार

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघातून भाजपच्या उमेदवारीसाठी अनेक जण इच्छुक आहेत. पक्षाची उमेदवारी न मिळाल्यास बंडखोरी करण्याची तयारी आजी-माजी आमदारांसह काहींनी केली आहे. त्या अनुषंगाने भाजपसह अपक्ष म्हणून अनेकांनी उमेदवारी अर्ज घेतले आहेत.

मीरा-भाईंदरमधून विद्यमान आ. गीता जैनसह माजी आ. नरेंद्र मेहता व त्यांची पत्नी सुमन, मीरा-भाईंदर विधानसभा निवडणूक निर्णय प्रमुख ॲड. रवी व्यास, माजी सभापती सुरेश खंडेलवाल आदींनी भाजपच्या नावाने उमेदवारी अर्ज घेतले आहेत, परंतु त्याचबरोबर आ. जैनसह नरेंद्र मेहता व सुमन मेहता यांनी अपक्ष म्हणूनही अर्ज घेतले आहेत. त्यामुळे भाजपची उमेदवारी मिळाली नाही तरी अपक्ष लढवण्याची तयारी असल्याचे उघड संकेत दिले आहेत.



गीता जैन



नरेंद्र मेहता

मेहता हे विविध कारणांनी वादात असले तरी ते मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या मर्जीतले मानले जातात. मेहतांसाठी मोर्चेबांधणी सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले. शिवाय मेहतांनी जाहीर सभा घेत शक्तिप्रदर्शन करून पक्षनेतृत्वावर उमेदवारीसाठी दबाव बनवल्याचे मानले जाते. याआधीही मेहता व समर्थकांनी हेमंत म्हात्रे व व्यास यांच्या जिल्हाध्यक्ष नियुक्तीवरून उघड पवित्रा घेत राजीनाम्याचा इशारा देऊन शक्तिप्रदर्शन केले होते.

लोकमत विधानसभा २०२४ सुपर Vote

## पाठिंब्याच्या बदल्यात उमेदवारीचे वचन

१ मीरा-भाईंदरमध्ये भाजपची उमेदवारी मिळाली नाही तर मेहता दाम्पत्याने अपक्ष अर्ज घेऊन वेळ पडल्यास बंडखोरी करत अपक्ष निवडणूक लढण्याचे संकेत दिले आहेत.

२ आ. जैन यांनी भाजप, शिवसेना व अपक्ष असे अर्ज घेतले आहेत. त्यांनी भाजप-शिंदेसेनेच्या महायुती सरकारला पाठिंबा दिल्याने शिंदे आणि फडणवीस यांनी उमेदवारी देण्याचे वचन दिले आहे.

३ आ. जैन यांना भाजप किंवा शिंदेसेनेच्या तिकिटावरून उमेदवारी द्यायची हे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्यावर सोपवल्याचे आ. जैन समर्थक सांगतात. मात्र वेळ पडल्यास आ. जैनही अपक्ष लढू शकतात असे दिसते.

४ माजी सभापती सुरेश खंडेलवाल हेही भाजपकडून कोणाला उमेदवारी मिळते व बंडखोरी कोण करणार हे पाहून निवडणूक लढवणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.



राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, खा. डॉ. हेमंत सवरा यांच्या उपस्थितीत राजन नाईक यांनी आपला अर्ज निवडणूक अधिकाऱ्यांना सादर केला.

# राजन नाईक यांचा नालासोपाऱ्यामधून अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : जोरदार शक्तिप्रदर्शन करत नालासोपारा विधानसभा मतदारसंघातून शुक्रवारी महायुतीकडून राजन नाईक यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. मनपा मुख्यालयात नाईक यांनी आपला अर्ज निवडणूक अधिकारी तथा प्रांताधिकारी शेखर घाडगे यांच्याकडे सादर केला. यावेळी राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, खासदार डॉ. हेमंत सवरा तसेच भाजप, शिंदेसेना, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, आरपीआय व मित्रपक्षाचे अनेक स्थानिक नेते उपस्थित होते.

## पोलिस ठाण्यात राजकीय १० गुन्हे

नाईक उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याने मतदारसंघातील महायुतीच्या कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. काही मोजक्याच पदाधिकाऱ्यांसमवेत जाऊन राजन नाईक यांनी आपला अर्ज दाखल केला. मनपा मुख्य कार्यालयाच्या परिसरात कडेकोट पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दरम्यान, राजन नाईक यांच्यावर वसई तालुक्यातील पोलिस ठाण्यात राजकीय १० गुन्हे दाखल आहेत.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पृ.५१ ९



# तलावात बुडून ४२ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विरारच्या आगाशी येथील धोबी तलाव परिसरात राहणारे किरण पवार (४२) यांचा तलावात बुडून मृत्यू झाला आहे.

किरण हे २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ७:३० वाजण्याच्या सुमारास हे धोबी तलाव साफ करण्यासाठी गेले ते रात्री ८:३० वाजेपर्यंत घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतल्यावर ते कोठेही सापडले नाहीत. पोलिसांनी व अग्निशमन दलाने तलावाच्या पाण्यात त्यांचा शोध घेतला, परंतु रात्रीची वेळ असल्याने ते सापडले नाहीत. गुरुवारी सकाळी ७:३० वाजण्याच्या सुमारास त्यांचा मृतदेह पाण्यावर तरंगताना दिसला. यानंतर कुटुंबातील नागरिकांनी पोलिसांना बोलावले. नंतर मृतदेह विरारच्या ग्रामीण रुग्णालय येथे घेऊन गेल्यावर डॉक्टरांनी मृत घोषित. केले. अर्नाळा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद गुरुवारी केली आहे.

# व्यावसायिकाची फसवणूक

नालासोपारा : विरार येथील वर्तक वॉर्ड येथील पिताश्री बंगला येथे राहणारे बांधकाम व्यावसायिक जगदीश म्हात्रे (५९) यांची ९ ऑगस्ट २०१४ ते सन २०१९ पर्यंत फसवणूक झाली आहे. बळवंत कुलकर्णी यांनी त्यांच्याकडील सदनिका म्हात्रे यांना विक्री करून त्यांच्याकडून वेळोवेळी चेकद्वारे तसेच रोख रक्कम स्वरूपात ७ लाख ६० हजार रुपये घेतले. मात्र, सदनिका न विकता म्हात्रे यांची फसवणूक केली आहे. म्हात्रे यांच्या तक्रार अर्जाची चौकशी करून आचोळे पोलिसांनी शुक्रवारी गुन्हा दाखल केला आहे.

# हद्दपार आदेशाचा भंग; गुन्हा दाखल




नालासोपारा : चंदनसार येथील कातकरी पाड्यात राहणाऱ्या शंकर दिव्या (३७) याला परिमंडळ-३ चे पोलिस उपायुक्त यांच्या आदेशानुसार एक वर्षासाठी हद्दपार केले होते. तो २१ ते २३ ऑक्टोबर दरम्यान कातकरीपाडा येथे राहत असल्याचे दिसले. आदेशाचा भंग केला म्हणून पोलिस हवालदार विशाल लोहार (३३) यांनी विरार पोलिस ठाण्यात गुरुवारी तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकमत पृ. ५१. ३

# बदलीस पात्र पोलिस अधिकाऱ्यांची दिली यादी

## महासंचालकांना दिलेल्या यादीबाबत आश्चर्य

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने केंद्रीय निवडणूक आयोगाने तीन वर्षांपेक्षा जास्त काळ झालेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या दोन दिवसात करून तसे प्रमाणपत्र सादर करण्याचे आदेश २८ सप्टेंबर रोजी दिले होते. मात्र, निवडणूक प्रक्रिया १५ ऑक्टोबरपासून सुरू झाल्यानंतर आता २३ ऑक्टोबर रोजी मीरा भाईंदर - वसई विरार पोलिस आयुक्तालयाने बदलीस पात्र ४१ अधिकाऱ्यांची यादी पोलिस महासंचालकांना सादर केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. त्यामुळे ऐन निवडणूक काळात बदल्या केल्या जातील का? असा प्रश्न केला जात आहे.

मीरा - भाईंदर हे शहर ठाणे जिल्ह्यात, तर वसई - विरार हे शहर पालघर जिल्ह्यात येते. या दोन शहरांना एकत्रित करून मीरा भाईंदर - वसई विरार पोलिस आयुक्तालय बनवले गेले आहे.



■ मीरा भाईंदर - वसई विरार पोलिस आयुक्तालयाने निवडणूक आयोगाच्या निर्देशानंतरदेखील बदलीस पात्र अधिकाऱ्यांची माहिती पोलिस महासंचालक यांच्याकडे पाठवली नव्हती. अखेर २३ ऑक्टोबर रोजी आयुक्तालयाने बदलीस पात्र ४१ पोलिस अधिकाऱ्यांची यादी महासंचालकांना पाठवली आहे. या यादीत सुमारे ३८ पोलिस निरीक्षक, २ सहायक आयुक्त व १ उपायुक्त यांचा समावेश असल्याचे सूत्रांनी सांगितले.

### आयुक्तालयाच्या बाहेर बदली करण्याचे आदेश

■ पूर्वी निवडणूक आयोगाच्या आदेशात जिल्हा बदलीचा उल्लेख असायचा. त्यात पोलिस आयुक्तालयाचा उल्लेख नसल्याने अधिकाऱ्यांच्या आयुक्तालयाअंतर्गतच जिल्हा बदल्या केल्या जात होत्या. मात्र, केंद्रीय निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने ३१ जुलै २०२४ रोजी बदल्यांबद्दल आदेश जारी केले होते. त्यामध्ये पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीचा स्पष्ट उल्लेख केला. एकापेक्षा जास्त जिल्ह्याचे क्षेत्र पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत असले तरी तीन वर्षे सेवा झालेल्या अधिकाऱ्याची त्या आयुक्तालयाच्या बाहेर बदली करण्याचे आदेश आहेत.

# मुलीला धमकावणाऱ्यास अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** एका १४ वर्षांच्या अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिला सतत त्रास देऊन धमकावणाऱ्या तरुणास भाईंदर पोलिसांनी अटक केली आहे.

भाईंदर येथे राहणारा २१ वर्षीय तरुण अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून, तिला 'तू मला आवडतेस, माझे तुझ्यावर प्रेम आहे' असे बोलला होता. तिने नकार दिला असता, त्याने तिच्या वडिलांना गाडीने उडवणार आणि तुझ्या आईलाही काहीतरी करेन, अशी धमकीही तिला दिली होती.

Scanned with OKEN Scanner

लोकमत ५.५.१४

# काम करून घेतले, पण ठेकेदारांचे पैसे टाळले

## सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरारोड रेल्वेस्थानकजवळील शांती शॉपिंग सेंटरमधील इमारत दुरुस्तीची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना त्यांच्या कामाचे पैसे देणाऱ्या धनादेशावर स्वाक्षरी करण्यास टाळाटाळ करणाऱ्या सोसायटी अध्यक्ष व खजिनदारासह सचिवावर नयानगर पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.

शांती शॉपिंग सेंटरमधील इमारतींच्या दुरुस्तीचे टेंडर देऊन शिवानंद परचंडे यांच्याकडून १० लाख ५० हजार रुपये रकमेचे, आसिफ शेख यांच्याकडून १० लाख ३९ हजार रुपयांचे, तर जयप्रकाश नायर यांच्याकडून १४ लाख ५३ हजार रुपयांचे, बालाजी जाधव यांच्याकडून ६ लाख ७५ हजार रुपये, असे एकूण ४२ लाख १८ हजार रुपयांचे काम करून घेतले.




### विविध कारणे देऊन धनादेशांवर सहीच नाही

सचिव नरेंद्र वंवानी यांनी ठेकेदारांच्या देय धनादेशावर सह्या केल्या, मात्र अध्यक्ष जे. पी. जैन व खजिनदार रूपा भट यांनी जाणीवपूर्वक आपापसात वाद करून या धनादेशांवर विविध कारणे देऊन स्वाक्षरी केली नाही. केलेल्या कामाचे पैसे न देता आमची आर्थिक फसवणूक केली म्हणून तिन्ही सोसायटी पदाधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सामना ५.१४

# आईनेच केला पोटच्या मुलीचा सौदा

भाईंदर, दि. २५ (सा.वा.) - काशिमीरा येथे एका निर्दयी मातेने आपल्या पोटच्या १३ वर्षीय अल्पवयीन मुलीचा सौदा केला असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. याप्रकरणी दलाल महिला आणि आईला पोलिसांनी अटक केली.

काशिमीरा येथील शाही फॅमिली रेस्टॉरंट येथे शबिनाझ सय्यद (३५) या पीडित मुलीच्या आईला वेश्याव्यवसाय करणारी महिला दलाल भेटायला आली. त्यावेळी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी १३ वर्षांच्या पोटच्या अल्पवयीन मुलीचा कौमार्यभंग करण्याच्या बोलीवर रक्कम ठरविण्यात आली. शबिनाझ सय्यद हिने दोन लाख रुपये रोख रक्कम स्वीकारताना अनैतिक मानवी प्रतिबंधक शाखेच्या पथकाने रंगेहाथ पकडले. अल्पवयीन मुलीला वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात आले आहे.

Scanned with OKEN Scanner

# नायगाव पूर्वेला फेरीवाल्यांचा विळखा, बेकायदा वसुली जोरात!

। वसई-नायगाव पूर्वेला फेरीवाल्यांच्या बेकायदा धंद्याचे साम्राज्य वाढत चालले असून, फेरीवाल्यांच्या विळख्यात अडकलेल्या नायगाव स्थानकाचा हा परिसर दुसऱ्या क्रमांकावर आला आहे. पालिका, कथित नेते आणि पोलिसांच्या नजरेखाली फेरीवाल्यांकडून बेकायदा वसुली होत असल्याने त्यांची मुजोरी वाढत चालली आहे.



नायगाव स्टेशनपासून सोपारा खाडी पुला पर्यंतच्या मुख्य मार्गावर बेकायदा फेरीवाल्यांनी बस्तान मांडले आहे. परेरा नगर आणि स्टार सिटी परिसरातही फेरीवाल्यांची संख्या वाढत चालली आहे. सोपारा खाडी पूल तर फेरीवाल्यांच्या व्यापातून जवळपास मुक्तच झालेला नाही. फेरीवाल्यांच्या या वाढत्या समस्येमुळे स्थानिक रहिवासी व पादचारी प्रचंड त्रस्त झाले आहेत. पालिका प्रशासन या बेकायदा फेरीवाल्यांवर कारवाई करण्यास अपयशी ठरले आहे. त्यामुळे नायगाव पूर्व परिसरातील रहदारी आणि स्थानिकांचे दैनंदिन जीवन वेठीस धरले गेले आहे. पादचाऱ्यांच्या मार्गात अडथळे निर्माण होत असून, रहदारीची समस्या गंभीर बनली आहे. स्थानिक रहिवासी वारंवार तक्रार करत असतानाही प्रशासनाने योग्य ती कारवाई केली नसल्यामुळे संताप व्यक्त केला जात आहे. नायगाव पूर्व परिसरात एक वडापाव विक्रेता राजकीय आणि पोलिस पाठबळाच्या जोरावर फेरीवाल्यांकडून बेकायदा वसुली करत असल्याचे स्थानिकांनी सांगितले. या वडापाव वाल्यावर कारवाई केल्यास अनधिकृत फेरीवाल्यांना ही चपराक बसेल असे येथील ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

वसई-विरार महानगरपालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार यांनी फेरीवाले आणि अतिक्रमण रोखण्यासाठी विशेष पथक तयार केले असून, सिपुसी विभागाचे पुनर्गठनही केले आहे. मात्र, कनिष्ठ अधिकाऱ्यांकडून आयुक्तांच्या आदेशांकडे 'दुर्लक्ष' होत असल्यामुळे फेरीवाल्यांच्या समस्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. या निष्क्रियतेमुळे नायगाव पूर्व आणि इतर परिसरात बेकायदा फेरीवाल्यांचे साम्राज्य फोफावले आहे. वसई-विरार परिसरात फेरीवाल्यांचे प्रश्न हे एका मोठ्या संकटाचे रूप घेत आहेत, आणि यावर तातडीने उपाययोजना न केल्यास आगामी काळात याचा फटका शहराच्या व्यवस्थापनावर आणि रहिवाशांच्या दैनंदिन जीवनावर मोठ्या प्रमाणात बसण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

---

# घरातून निघून गेलेल्या महिलेचा दोन मुलांसह पोलिसांनी लावला शोध

। मीरा रोड। काशीमीरा परिसरात राहणाऱ्या एक महिला व तिची दोन मुले हे अडीच महिन्यापासून घरातुन निघून गेले होते. ते मिसिंग असल्याची तक्रार काशीमीरा पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. याचा मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेने तपास करून वाराणसी, उत्तरप्रदेश येथे शोधून आणले आहे.

काशीमीरा पोलिस ठाणे हद्दीतील पेणकरपाडा येथे राहणाऱ्या सुजाता मिथलेश चौधरी (४०) व अभिजीत मिथलेश चौधरी (२२), आदित्य मिथलेश चौधरी (१९) त्यांची दोन मुले हे तिघेही ५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी कोणालाही काही न सांगता घरातून निघून गेले होते. त्यांची मिसींग तक्रार काशिमिरा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. मिसींग महीला व तिची दोन्ही मुले यांना गेले अडीच महिने पोलीसांना कोणताही ठावठिकाणा मिळून येत नव्हता. तक्रारदार यांना त्याच्या पत्नी व मुलांचा अडीच महिन्यात काहीही संपर्क न झाल्याने त्यांचे कोणीतरी काहीतरी बरेवाईट केले असावे अशी भिती वाटू लागल्याने तक्रारदार यांनी गुन्हे शाखेशी संपर्क केला. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांनी सुचना दिल्याप्रमाणे मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी राहुल राख यांनी पोउपनिरी. हितेंद्र विचारे, पोहवा, हनुमंत सुर्यवंशी असे तपास पथक तयार केले. या पोलीस पथकाने मनुष्य मिसींगची काशिमीरा पोलीस ठाणेतून माहिती घेतली. त्यानुसार तपास करून तपासात सातत्य ठेवून वरील तिन्ही मिसींग हे वाराणसी, उत्तरप्रदेश येथे असल्याची माहिती मिळवली. त्यानंतर वरिष्ठांच्या परवानगीने पोहवा हनुमंत सुरेश सुर्यवंशी यांना पाठवण्यात आले होते. पोहवा हनुमंत सूर्यवंशी यांनी मिळालेल्या माहितीनुसार तिन्ही मिसींग व्यक्तीचा रामनगर पोलीस ठाणे, वाराणसी, उत्तरप्रदेश येथील पोलीसांचे मदतीने शोध घेतला असता तिन्ही मिसींग व्यक्ती हे भिटी सुलतानपुर, रामनगर, वाराणसी, उत्तरप्रदेश येथे मिळून आले आहेत. पोलीसांनी चौकशी केली असता त्या महिलेच्या मुलाचे शेअर बाजारात मोठे नुकसान झाले होते.

Scanned with OKEN Scanner

पुढारी पु. पा 2

# मिरा-भाईंदरमधील महायुतीच्या अघोषित उमेदवारीमुळे मतदारांत संभ्रम

## विधानसभेच्या निवडणुकीत इच्छुकांची मांदियाळी

**भाईंदर : राजू काळे**

१४५ मिरा-भाईंदर विधानसभा मतदार संघातून भाजपच्या इच्छुकांसह शिवसेनेच्या इच्छुकांनी उमेदवारी अर्ज घेत आपली संभाव्य उमेदवारी राखून ठेवण्याचा आटापिटा चालविला आहे. यात भाजपचे माजी आ. नरेंद्र मेहता व त्यांच्या पत्नीने उमेदवारी अर्ज घेतल्याने उमेदवारीवरील अनिश्चिततेचे सावट आणखी गडद होऊ लागले आहे. भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढविण्यास विद्यमान अपक्ष आ. गिता जैन यांच्यासह माजी आ. नरेंद्र मेहता प्रामुख्याने स्पर्धेत असले तरी भाजपच्या अथवा महायुतीच्या अघोषित उमेदवारीमुळे येथील मतदारांत संभ्रम निर्माण झाला आहे.

या मतदारसंघात मविआकडून काँग्रेसचे माजी आ. मुझफ्फर हुसैन यांना उमेदवारी दिली आहे. त्यांना आव्हान देणाऱ्या उमेदवाराचे नाव अद्याप महायुतीकडून जाहीर केलेले नाही. हा मतदार संघ भाजपचा असून गतवेळच्या निवडणुकीत भाजपचे आ. नरेंद्र मेहता यांना अपक्ष उमेदवार गिता जैन यांनी सुमारे १५ हजार मतांनी पराभूत केले. यानंतर जैन यांनी सुरुवातीला भाजपला सत्तेसाठी पाठिंबा दिला. मात्र पहाटेच्या शपथविधीने घात करीत युतीची सत्ता अल्पावधीत जाऊन मविआची सत्ता स्थापन झाली. त्यावेळी जैन यांनी मविआमध्ये आपले बस्तान मांडले. या सोयीच्या राजकारणानंतर जैन यांनी सतत पक्षाचा पाठिंबा बदलत आपली राजकीय कारकीर्द कायम ठेवली. काही महिन्यांपूर्वी पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत मविआचे उमेदवार राजन विचारे यांना मिरा-भाईंदरमधून चांगली मते मिळाल्याने मतदारांनी महायुतीला धक्का देण्याचा प्रयत्न केला. मात्र यात मविआतील शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के यांचा अनपेक्षित विजय झाला. पाठोपाठ विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले असून इच्छुकांची मांदियाळी सुरू झाली आहे. इच्छुकाने उमेदवारीसाठी पक्षाच्या नेत्यांचे उंबरठे झिजवले. ज्यांना उमेदवारी नाही मिळाली त्यांनी बंड करीत पक्षांतर केले तर काहींनी अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे.

### जैन मेहता यांच्यात स्पर्धा

या मतदार संघातून भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढविण्यासाठी विद्यमान अपक्ष आ. गिता जैन यांच्यासह माजी आ. नरेंद्र मेहता यांच्यात प्रामुख्याने स्पर्धा लागली आहे. या दोघांपैकी जैन यांना भाजपमधून उमेदवारी मिळाल्यास मेहता अथवा त्यांची पत्नी सुमन या अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्याची शक्यता आहे. आणि मेहता यांना उमेदवारी मिळाल्यास जैन या पुन्हा अपक्ष उमेदवार म्हणून निवडणुकीत उतरण्याची शक्यता आहे.

### फायदा महायुतीच्या उमेदवाराला

ही जागा शिवसेनेच्या वाटेला गेल्यास सेनेकडून माजी नगरसेवक तथा आ. प्रताप सरनाईक यांच्या अत्यंत निकटवर्तीय मानले जाणारे विक्रम प्रताप सिंह यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. जर विक्रम प्रताप सिंह यांना उमेदवारी मिळाल्यास मेहता व जैन अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्याची शक्यता असून त्याचा फायदा महायुतीच्या उमेदवाराला होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तूर्तास या मतदार संघातून भाजप अथवा महायुतीकडून अद्याप उमेदवारी जाहीर न झाल्याने मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

# ऑनलाईन फसवणुकीतील २० लाख मिळाले परत

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरा रोड येथे राहणाऱ्या व्यक्तीला त्यांच्या मोबाईलवर एका अनोळखी इसमाने लिंक पाठवून ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक करण्यास सांगून फसवणूक केली होती. या फसवणूक झालेल्या रकमेपैकी २०,२५,००० रुपये तक्रारदार यांना सायबर पोलीसांनी तपास करून परत मिळवून दिले आहेत.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील नयानगर पोलीस ठाणे हद्दीत राहणारे तक्रारदार दत्तानी यांच्या मोबाईलवर फेक शेअर ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक करण्यासाठी अनोळखी लिंक प्राप्त झाली. या लिंकमध्ये ऑनलाईन शेअर ट्रेडिंग करून अधिक लाभ मिळत असल्याचे आमिष दाखवून गुंतवणूक करण्याबाबत सांगितले होते. तक्रारदार यांनी त्यांना आलेली लिंक ओपन करुन पैशाची गुंतवणूक केली. परंतु तक्रारदार यांना गुंतवणूक केल्यानंतर कोणताही परतावा मिळाला नाही. त्यावर तक्रारदार यांना आर्थिक फसवणूक झाल्याने सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज सादर केला. सायबर पोलीसांनी त्या तक्रारी अर्जाची नोंद घेतली तसेच ऑनलाईन एनसीसीआरपी पोर्टलवर तक्रार नोंदविण्यात आली.

### न्यायालयात याचिका

फसवणुकीची वर्ग झालेली रक्कम संशयित बँक खात्यात थांबवण्यात आली. तक्रारदार यांची बँक खात्यांमध्ये थांबवण्यात आलेली रक्कम परत मिळवण्यासाठी न्यायालयामध्ये अर्ज सादर करण्याबाबत तक्रारदार यांना सूचना देण्यात आल्या. तक्रारदार यांनी त्यांची फसवणुकीची रक्कम परत मिळवण्यासाठी न्यायालयात याचिका सादर केली, त्याबाबत सायबर पोलीस ठाणे यांनी न्यायालयामध्ये सविस्तर अहवाल सादर केला व न्यायालयाचे आदेश प्राप्त केले.

Scanned with OKEN Scanner

म. टा. पु. पा. क्र. १

# राजन नाईक यांनी भरला उमेदवारी अर्ज

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

नालासोपारा मतदारसंघातून महायुतीतर्फे भाजपच्या राजन नाईक यांना उमेदवारी दिल्यानंतर शुक्रवारी त्यांनी आपला उमेदवारी अर्ज भरला आहे. यावेळी भाजपने मोठे शक्ती प्रदर्शन करत शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत अर्ज भरला असून त्यांनी ३ फॉर्म एकाच वेळी भरले आहेत. नाईक यांच्या व्यतिरिक्त दुसरा कोणत्याही पक्षाचा किंवा अपक्ष उमेदवाराने शुक्रवारपर्यंत फॉर्म भरला नसल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातून सांगण्यात आले.

विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीकडून



उमेदवारांच्या जाहीर केलेल्या पहिल्या यादीमध्येच नालासोपारा मतदारसंघातून राजन नाईक यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले होते. यानंतर नालासोपारा मतदारसंघात भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. त्यानंतर शुक्रवारी राजन नाईक यांनी नालासोपारा विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी शेखर घाडगे यांच्याकडे उमेदवारी अर्ज सुपूर्द केला आहे. त्यांनी एकूण ३ अर्ज दाखल केले असून यावेळी त्यांच्यासोबत भाजपचे ज्येष्ठ नेते विनोद तावडे, खासदार डॉ हेमंत सावरा, शिवसेनेचे नवीन दुबे यांच्यासह इतर ज्येष्ठ नेते उपस्थित होते. तर शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत म्हाडा वसाहत ते निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयापर्यंत पायी चालत शक्ती प्रदर्शन करण्यात आले. उमेदवारी अर्ज भरताना अतिशय आनंद होत असल्याची भावना यावेळी राजन नाईक यांनी व्यक्त केली. तसेच पहिल्याच यादीत नाव जाहीर करून पक्षाने विश्वास दाखवला असून त्या विश्वासाला तडा जाऊन देणार नाही. त्यामुळे सत्तेत आल्यावर विकास काय असतो आणि कसा होऊ शकतो हे येणाऱ्या जनतेला नक्कीच कळेल, असे राजन नाईक यांनी सांगितले.

**नालासोपारा मतदारसंघातून ४४ फॉर्म**

पालघर जिल्ह्यात सहा विधानसभा मतदारसंघ असून या मतदारसंघांमध्ये सर्वच पक्षांनी तयारी सुरू केली आहे. काही पक्षांतर्फे उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील वसई, नालासोपारा मतदारसंघांसाठी ७२ फॉर्मचे वितरण करण्यात आले आहे. नालासोपाऱ्यातून ४४ फॉर्म वितरित झाले आहेत.

# मुझफ्फर हुसेन पुन्हा नशीब आजमावणार

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**



मिरा-भाईंदर विधानसभा क्षेत्रातून काँग्रेसचे माजी आमदार मुझफ्फर हुसेन पुन्हा नशीब आजमावणार आहेत. महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून काँग्रेसकडून त्यांना गुरुवारी उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. मागील विधानसभा निवडणुकीत हुसेन यांना तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले होते.

मिरा-भाईंदरमधून महाविकास आघाडीकडून हुसेन विधानसभा निवडणुकीत उतरणार असल्याचे लोकसभा निवडणुकीनंतर म्हटले जात होते. हुसेन यांनी मागील काही महिन्यांपासून मोर्चेबांधणी सुरू केल्याचेही पाहायला मिळत होते. अखेर गुरुवारी काँग्रेसकडून पहिली उमेदवारी यादी जाहीर करण्यात आली आहे. यात मिरा-भाईंदरच्या जागेकरीता हुसेन यांचे नाव जाहीर करण्यात आले आहे.

यापूर्वी प्रामुख्याने मिरा-भाईंदर क्षेत्रातून २०१४ साली हुसेन यांनी विधानसभा निवडणूक लढवली होती. यावेळी त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले जोते. त्यांच्या पारड्यात ५५ हजार मते पडल्याने ते तिसऱ्या क्रमांकावर होते. महायुतीकडून ही जागा लढवण्यासाठी अनेक जण इच्छुक आहेत. या कारणास्तव अद्याप येथील उमेदवार जाहीर करण्यात आलेला नाही. त्यामुळे हुसेन यांची लढत महायुतीमध्ये कोणाशी होते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. माजी आमदार नरेंद्र मेहता व आमदार गीता जैन यांच्यातील वाद सर्वश्रुत आहे. हे दोघेही महायुतीकडून इच्छुक असून त्यांच्यात पुन्हा लढत होण्याची शक्यता अधिक आहे. तसेच मिरा-भाईंदरकरांनी विधानसभा निवडणुकीत नव्या उमेदवाराला संधी दिल्याचे दिसले आहे.

Scanned with OKEN Scanner

NBT 41.9.8

# टोल माफी के बाद भी लगा रहता है लंबा ट्रैफिक ज़ाम

## दहिसर टोल नाके पर अब भी वाहनों की लंबी कतारों से नहीं मिल रही राहत

■ अमित तिवारी, मीरा-भाईदरः राज्य सरकार ने हाल ही में मुंबई के प्रवेश द्वारों पर स्थित पांच टोल नाकों पर छोटे वाहनों के लिए टोल माफ करने का निर्णय लिया है। इसके तहत दहिसर चेकनाके से गुजरनेवाले छोटे वाहनों का भी समावेश है। मीरा-भाईदर, वसई, विरार व गुजरात से मुंबई आने-जा वाली गाड़ियां दहिसर टोल नाके का ही इस्तेमाल करती है। छोटी गाड़ियों पर टोल माफी से उम्मीद थी कि इस चेकनाके पर लगने वाली ट्रैफिक जाम की समस्या से निज़ात मिलेगी, लोगों की परेशानी कम हो जाएगी, लेकिन जमीनी हकीकत कुछ और ही है। आज भी दहिसर चेकनाका पर पहले जैसा ही लंबा ट्रैफिक जाम लग रहा है। कुछ मिनट की दूरी को तय करने में ही घंटों का समय लग जाता है।


**सरकार ने मुंबई के पांच टोल नाको पर छोटे वाहनो के लिए टोल माफ करने का निर्णय लिया है**

### मिनट की दूरी तय होती है घंटे में

सीए अभिषेक तिवाड़ी को अपने काम से आए दिन मुंबई आना-जाना होता है। उन्होंने बताया कि टोल माफी का आम आदमी को कुछ खास फायदा नहीं हुआ है। पैसे भले ही बच रहे हों, लेकिन वाहन चालकों का समय पहले से भी अब ज्यादा लग रहा है। शुक्रवार को वह मुंबई की ओर आ रहे थे। काशिमीरा नाके से दहिसर चेकनाके की दूरी मात्र 5 मिनट की है, लेकिन उन्हें ये दूरी कार से तय करने में ही 1 घंटे का समय लग गया। उन्होंने कहा कि हालांकि यहां पर मेट्रो के काम के कारण भी ट्रैफिक बढ़ रहा है।

## वाहन चालकों को 5 मिनट के समय को तय करने में लग रहे हैं कई घंटे

NBT पड़ताल



ट्रैफिक जाम से निज़ात नहीं

आशीष पांडे रोजाना विलेपार्ले स्थित अपने कार्यालय के लिए इसी मार्ग का उपयोग करते है। वे बताते है कि टोल माफी का ट्रैफिक पर कोई असर नही हुआ है। सुबह के समय मे दहिसर-चेकनाके से काशीमीरा, घोड़बंदर तक हमेशा ट्रैफिक जाम की समस्या से गुजरना पड़ता है। टोल माफी का लक्ष्य ट्रैफिक को कम करना भी है, लेकिन उसके लिए इंतजाम करने की दरकार है।

### पैसा तो बचा, लेकिन समय नहीं

ऐडवोकेट कुलदीप जैन को अदालत की कार्यवाही के लिए बोरीवली, गोरेगांव कोर्ट में जाना पड़ता है। वे कहते हैं कि सड़क पर लगनेवाले ट्रैफिक जाम के कारण उन्हें कई बार कोर्ट पहुंचने में देरी हो जाती है। टोल माफी के निर्णय से पैसा तो बच गया, लेकिन समय नहीं बच रहा है। ट्रैफिक जाम से परेशान ऐडवोकेट जैन कहते हैं कि भले ही टोल का पैसा ले लो, लेकिन ट्रैफिक जाम से लोगों को मुक्ति तो दिलाओ।

### बढ़ गया है प्रदूषण का स्तर

दहिसर चेकनाके के आसपास प्रदूषण का स्तर बढ़ गया है। लगातार वाहनों से निकलने वाले धुएं के कारण पूरे परिसर में वायु की गुणवत्ता घट रही है, हवा प्रदूषित हो गई है। उसी परिसर में रहने वाले डॉ राजेश शुक्ला कहते हैं कि परिसर में सुबह और शाम के समय में जॉगिंग करना लोगों की सेहत के लिए हानिकारक है। प्रशासन को इस पर तुरंत ध्यान देने की आवश्यकता है।

Scanned with OKEN Scanner

NBT 41.3.8

# आदम बस्तियों के लिए उजाड़े जा रहे हैं खाड़ी किनारे से मैंग्रोव्ज!

■ सुरेंद्र नेगी, वसई: नायगांव में जैसे-जैसे आबादी बढ़ रही है, वैसे-वैसे बस्तियों का निर्माण कार्य भी तेजी से हो रहा है। इनमें बड़े पैमाने पर अवैध निर्माण कार्य भी शामिल हैं। पिछले दो वर्षों में यहां मैंग्रोव्ज काट कर अवैध बस्तियां बसाई गई है। यह सिलसिला अनवरत जारी है। ताजा मामला नायगांव में डॉन बास्को स्कूल के पीछे का है। बड़े पैमाने पर मैंग्रोव्ज काटकर इमारतें बनाई जा रही हैं। पर्यावरण से जुड़ी सामाजिक संस्थाओं की शिकायत के बाद भी राजस्व और वन विभाग मैंग्रोव्ज की कटाई पर रोक लगाने में नाकाम रहे हैं। गौरतलब है कि मैंग्रोव्ज को लेकर हाल ही में हाई कोर्ट ने भी गाइडलाइंस जारी की है। अदालत ने भी साफ किया है कि मैंग्रोव्ज के काटे जाने से पर्यावरण को भारी क्षति पहुंचती है। मैंग्रोव्ज को नुकसान पहुंचाने वालों के खिलाफ कड़ी कार्रवाई होनी चाहिए।

नायगांव में नहीं थम रही है मैंग्रोव की कटाई, जारी है खाड़ी किनारे अवैध भराई

**20 साल पहले इलाका मैंग्रोव से था भरा हुआ:** बता दें कि दो दशक पहले नायगांव का पूर्वी भाग मैंग्रोव्ज से भरा हुआ था। तब यहां की आबादी लगभग पचास हजार थी, लेकिन जैसे-जैसे यहां आबादी बढ़ने लगी, वैसे-वैसे भूमाफिया भी सक्रिय होने लगे। यहां की सरकारी जमीनों पर धड़ल्ले से कब्जा कर धीरे-धीरे बस्तियां बसाई जाने लगी। निम्न आय वर्ग के लोगों को सस्ते में घर बेचे जाने लगे। कम कीमत पर घर खरीदने के लिए यहां लोग आने लगे और आबादी तेजी से बढ़ने लगी।



## राजस्व व वन विभाग कार्रवाई नहीं करता

सामाजिक संगठनों का आरोप है कि सरकारी विभाग की निष्क्रियता के कारण नायगांव में भूमाफिया सक्रिय हो उठा। पर्यावरण के नियमों का उल्लंघन करते हुए बड़े पैमाने पर मैंग्रोव्ज काट कर अवैध निर्माण शुरू हो गया। खाड़ी के आसपास की जमीनों पर बड़ी-बड़ी इमारतें भी खड़ी हो गई। आरोप है कि साल 2010 में एक भूमाफिया ने अपनी दबंगई से लगभग तीन किमी. के दायरे में मैंग्रोव्ज काटकर सैकड़ों मकान बनाए। पक्की सड़क भी बनाई। हालांकि शिकायतों के बाद साल 2017 में उस पर मामला दर्ज किया गया।

पूर्व सांसद राजेन्द्र गावित ने पर्यावरण सुरक्षा को ध्यान में रखते हुए वर्ष 2022 में इस मुद्दे को फिर से उठाया। विभागीय अधिकारियों को कड़ी कार्रवाई के आदेश दिए गए, लेकिन राजस्व व वन विभाग ने कोई कार्रवाई नहीं की। पिछले साल 2023 में बापाने के पास एक रिजर्वेशन जमीन पर मौजूद मैंग्रोव्ज की बड़े पैमाने पर कटाई की गई और सैकड़ों रूम बना दिए गए। हालांकि शिकायत मिलने पर राजस्व विभाग ने 22 लोगों के खिलाफ केस दर्ज किया था। हालांकि उसके बाद फिर से मैंग्रोव्ज की कटाई शुरू हो गई। दो दिन पहले नायगांव पूर्व में डॉन बास्को स्कूल के पीछे बड़े पैमाने पर मैंग्रोव्ज काटे गए।

" वसई-विरार में मैंग्रोव्ज को नष्ट करने वालों के खिलाफ हमारी ओर से कार्रवाई जारी है, विधानसभा चुनाव के बाद बड़ी कार्रवाई की जाएगी।

*- शेखर घाडगे, प्रान्त अधिकारी, वसई*

" सभी विभागीय अधिकारियों से शिकायत की गई है, लेकिन कोई कार्रवाई नहीं हुई। नायगांव में पर्यावरण व मैंग्रोव्ज खतरे में है। इसकी उच्च स्तरीय जांच होनी चाहिए, संबंधित अधिकारियों पर कार्रवाई होनी चाहिए। *-राजीव सिंह, आदर्श फाउंडेशन के अध्यक्ष*

Scanned with OKEN Scanner

नवभारत पृ. पा 4

# मीरा-भाईंदर सीट पर महायुति में महासंग्राम

## मनसे-निर्दलीय उम्मीदवार बिगाड़ सकते हैं समीकरण



■ विनोद मिश्रा @ नवभारत.

भाईंदर. महाराष्ट्र विधानसभा चुनाव की घोषणा हुए आज 12 दिन हो गए हैं, लेकिन मीरा-भाईंदर विधानसभा सीट से महायुति की तरफ से शुक्रवार तक किसी उम्मीदवार के नाम की अधिकृत घोषणा नहीं की गई है. जबकि महाविकास आघाडी से कांग्रेस के प्रदेश कार्यकारी अध्यक्ष एवं पूर्व विधायक मुजफ्फर हुसैन के नाम की घोषणा कर दी गई है. महायुति में इस सीट से टिकट पाने के लिए महाभारत मचा हुआ है और उम्मीदवार के नाम पर अंतिम मुहर लगने का इंतजार है. मीरा-भाईंदर विधानसभा सीट से महायुति का टिकट हासिल करने के लिए सीटिंग विधायक गीता भरत जैन, पूर्व विधायक नरेंद्र मेहता, विधानसभा चुनाव प्रमुख व बीजेपी के पूर्व जिलाध्यक्ष एड. रवि व्यास, शिंदे शिवसेना से विधानसभा क्षेत्र प्रमुख विक्रम प्रताप सिंह आदि ने एड़ी-चोटी का जोर लगा रखा है. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ने अभी हाल ही में स्पष्ट किया था कि मूल शिवसेना से बगावत के समय जो विधायक उनके साथ गुवाहाटी गए और उनके समर्थन में खड़े रहे, उन्हें टिकट अवश्य मिलना चाहिए. इसके अलावा ठाणे लोकसभा क्षेत्र अंतर्गत 6 विधानसभा सीटों में से 3 सीटों पर बीजेपी ने अपने उम्मीदवारों के नाम घोषित कर दिए हैं.


### किसी कीमत पर सीट देना नहीं चाहती भाजपा




इस समीकरण से भी सीएम शिंदे बाकी की 3 सीटों पर अपना दावा ठोंक रहे हैं. दूसरी तरफ मीरा भाईंदर शहर में बीजेपी का जनाधार और वोट बैंक देखकर बीजेपी यह सीट छोड़ना नहीं चाह रही है. बीजेपी 145 विधानसभा सीट के साथ मीरा भाईंदर मनपा पर अपना कब्जा जमाए रखना चाहती है. इस कशमकश में इस सीट से उम्मीदवार के नाम की घोषणा में विलंब हो रही है. राजनीतिक सूत्रों के अनुसार मीरा - भाईंदर विधानसभा सीट के साथ - साथ करीब डेढ़ दर्जन अन्य सीटों पर महायुति के घटक दलों के बीच सहमति नहीं बन पा रही है. उन सीटों के बंटवारे का समीकरण बनाने के लिए गृहमंत्री अमित शाह के साथ सीएम शिंदे, डीसीएम फडणवीस और अजित पवार की कई चरणों में मीटिंग हो चुकी है. जिससे उम्मीदवारों के नाम की घोषणा पर अंतिम मुहर लगने की अटकलें तेज हैं. 29 को नामांकन भरने की अंतिम तिथि है, जिसका काउंटडाउन शुरू है.

### इच्छुक उम्मीदवारों के दिलों की बढ़ीं धड़कनें

■ इच्छुक उम्मीदवारों के दिलों की धड़कनें बढ़ती जा रही हैं. वहीं दूसरी तरफ इस चुनावी समर में मीरा भाईंदर विधानसभा सीट से मनसे ने संदीप राणे को अपना अधिकृत उम्मीदवार घोषित कर दिया है. पूर्व नगरसेवक हंसुकुमार पांडे ने भी गाजे बाजे के साथ अपना नामांकन गुरुवार को कर दिया है.



■ पूर्व नगरसेवक अरुण कदम ने भी चुनाव लड़ने का मन बना लिया है. इस तरह से देखें तो ये सभी उम्मीदवार अपने - अपने जीत का दावा भले ही कर रहे हों. लेकिन इन सबके चुनावी मैदान में उतरने से महायुति के उम्मीदवार की राह कठिन और आघाड़ी के कांग्रेस की राह आसान होने की चर्चा शहर में जारी है.

## नायगांव में गर्दन पर ब्लेड मारकर आत्महत्या करने की कोशिश

भास्कर संवाददाता। वसई. नायगांव में एक युवक ने खुद को ब्लेड मारकर आत्महत्या करने का प्रयास किया। हालांकि पुलिस की सतर्कता और स्थानीय निवासियों के सहयोग से युवक बचा लिया गया है। खून से लथपथ युवक को पुलिस ने नजदीकी अस्पताल ने भर्ती कराया है। युवक की पहचान छोटू निषाद के रूप में हुई है। वह मूल रूप से उत्तर प्रदेश का निवासी है। नायगांव पुलिस स्टेशन के पुलिस उप निरीक्षक सूरज जंगताप ने बताया. कि शुक्रवार शाम परेरा नगर इलाके में एक 25 वर्षीय युवक ने ब्लेड से गर्दन, हाथ आदि स्थान पर वार कर खुद को जख्मी कर लिया था। इस घटना को स्थानीय लोगों ने देखा और पुलिस को सूचना दी।.

दैनिक भास्कर पान 5

Scanned with OKEN Scanner

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# काशीमिरा येथून हरवलेली महिला-मुले उत्तर प्रदेशला सापडली

✦भाईंदर । मीरारोड पूर्वेच्या काशीमिरा पोलीस ठाणे हद्दीतील पेनकरपाडा येथे राहणारी एक ४० वर्षीय महिला आणि तिची २२ वर्ष व १९ वर्षांची मुले अचानक गायब झाल्याची तक्रार काशीमिरा पोलीस ठाण्यात दाखल झाली होती. सदरील घटना गंभीर असल्याने तसेच मागील अडीच महिन्यापासून सदरील कुटुंब मिळून येत नसल्याने वरिष्ठांनी तपास करण्याच्या सूचना दिल्या. त्यावरून मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पथकाने उत्तर प्रदेशातील वाराणसी येथे जाऊन शोधले आहे.

Palghar Edition
Oct 25, 2024 Page No. 5
Powered by: erelego.com

Scanned with OKEN Scanner

# Mira-Bhayandar: 'Missing' For 2 Months, Kashimira Family Traced By Cops In Uttar Pradesh

*More than two months after three members of family including a woman and her two sons had mysteriously disappeared from their apartment in the Penkarpada area of Kashimira, the central crime unit (CCU) attached to the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) traced them in a village in Uttar Pradesh.*

Suresh Golani**Updated:** sat, October 26, 2024, 09:27 PM IST

**Mira Bhayandar:** More than two months after three members of family including a woman and her two sons had mysteriously disappeared from their apartment in the Penkarpada area of Kashimira, the central crime unit (CCU) attached to the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) traced them in a village in Uttar Pradesh. According to the police, a complaint was registered at the Kashimira police station by Mithilesh Jogi Choudhary (45) stating that his wife-Sujata (40), sons-Abhijeet (22) and Aditya (19) were missing since the morning of 5, September.

Mithilesh who works in the diamond industry established contact with all his friends and relatives in the city and their native place in Bihar, but there was virtually no clue about his family members. Worried about their well-being, Mithilesh who went into depression registered the complaint. Sensing the seriousness of the case, a team from CCU led by police sub inspector- Hitendra Vichare started investigations.

On the virtue of electronic surveillance, they learnt about their presence in Varanasi, Uttar Pradesh (UP). Police personnel- Hanumant Suryavanshi immediately left for UP and traced them to Bhiti-Sultanpur village with the help of his local counterparts.

Scanned with OKEN Scanner

Times of India p-5, The Indian Express-p

# ₹29L, firearms & liquor seized in city, vicinity; four arrested

**Mumbai:** The police have caught a milk distributor who was travelling in a car with Rs 29 lakh in cash. They intercepted the car and brought him to the police station. The man said he runs Siddivinayak Milk Distribution and was carrying the cash for a business deal from Santacruz to Chembur when the police caught him. The police said they froze the funds seized and informed income tax officials.

In Palghar district, authorities arrested four persons and seized firearms and liquor over a period of three days in different operations district.

**Cash, liquor, drugs and metal together pegged at Rs 100.4 crore have been seized by the Election Commission across the state, said a press release.**

On the C-Vigil app, 1,259 complaints were received, of which 1,250 were resolved, said the release.

The State Election Commission has also warned that no exit polls may be conducted between Nov 13 and Nov 20, the day of polling, up to 6.30 pm in the evening. No opinion polls may be conducted 48 hours prior to the voting. TNN

▶Gold intercepted, P 7

# Woman, two sons reported missing in Thane traced to UP

PRESS TRUST OF INDIA
THANE, OCT 25

A WOMAN and her two sons reported missing from their home in Maharashtra's Thane district two months ago have been traced to Uttar Pradesh, police said on Friday.

Sujata Mithlesh Chowdhary (40) and her sons Abhijit (22) and Aditya (19) were reported missing from their home in the Mira Road area in August, senior inspector Rahul Rakha said.

Following their disappearance, the woman's husband lodged a missing person's complaint at Kashimira police station, he said.

During the probe, police received several technical and intelligence inputs and traced the trio to Varanasi, the official said.

Investigations revealed that the two sons suffered losses in stock market trading and decided to leave home, fearing repercussions, he said, adding that the family has been reunited.

Scanned with OKEN Scanner